**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सुभाष खुशालचंद मालपाणी
९/८८, सांगली रोड, रेंदाळकर मळा,
इचलकरंजी, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, (सामान्य प्रशासन विभाग )
नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी,जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुभाष खुशालचंद मालपाणी
९/८८, सांगली रोड, रेंदाळकर मळा,
इचलकरंजी, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, (सामान्य प्रशासन ),
विभाग पुणे विभाग, पुणे श्री. प्रकाश सं. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी,जि.कोल्हापूर श्री. त्रिंबक ढेंगळे पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.३.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मुख्याधिकारी यांचेकडे ना हरकत दाखला मिळणे संदर्भात नागरिकांनी, तसेच शहरातील विविध संस्थांनी केलेल्या अर्जांच्या सत्यप्रती, अर्ज मागणीनुसार मुख्याधिकारी यांचेकडून दिलेल्या ना हरकत दाखल्याच्या सत्यप्रती, नगरपालिकेकडून ना हरकत दाखला देणेसंदर्भात आकारण्यात आलेल्या शुल्काच्या रकमेच्या पावतीची नक्कल इत्यादी

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

नगरपालिकेकडील ना हरकत दाखल्याच्या संदर्भातील माहिती इचलकरंजी नगरपालिकेचे मुख्याधिकारी व नगररचना अधिकारी यांनी आधी दिली नाही व नंतर दुसरीच व दिशाभूल करणारी माहिती दिली. आपल्या पदाचा त्यांनी गैरवापर केला असल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे व माहिती न दिल्याबद्दल दंडात्मक कारवाई करावी, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुभाष खुशालचंद मालपाणी यांनी केले. मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारात ना हरकत दाखले दिले व त्याची कागदोपत्री नोंद केलेली नाही. त्यामुळे नगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी चौकशी व्हावी, अशीही मागणी त्यांनी केली.

संबंधित दाखल्याबाबत नक्कल शुल्क भरुन माहिती घ्यावी, असे श्री. मालपाणी यांना विहित मुदतीत कळविले होते. त्यांनी शुल्क भरले नाही. मूळ अर्जातील मागणीपेक्षा वेगळ्या माहितीची मागणी प्रथम अपिलाच्या सुनावणीत केली. यापूर्वीही दोन वेळा त्यांनी माहिती मागितली, परंतु शुल्क भरले नाही. सात दिवसांत माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांनी दिल्यानंतरही श्री. मालपाणी यांना माहिती घेऊन जाण्याबाबत रजिस्टर टपालाने कळविले होते, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, श्री. त्रिंबक ढेंगळे पाटील यांनी केले.

श्री. मालपाणी यांनी शुल्क भरुन माहिती घेणे आवश्यक होते. माहिती न पाहताच ती चुकीची असल्याचे त्यांनी नमूद केले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री. प्रकाश सं. पाटील यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, यांनी शुल्क कळविल्यानंतर ते न भरता माहिती न मिळाल्याची तक्रार करणे व माहिती न पाहताच ती चुकीची असल्याचा आक्षेप घेणे ही अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. तसेच मूळ अर्जाव्यतिरिक्तची मागणी अपिलात करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १६ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आकाराम मारूती शिसाळ
मु.पो. ता. पलूस, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पलूस, ता.पलूस, जि.सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
डॉ. पंतगराव कदम औद्योगिक वसाहत सहकारी
सोसायटी लि. पलूस, ता.पलूस, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३६/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २२.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. आकाराम मारूती शिसाळ
मु.पो. ता. पलूस, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पलूस, ता.पलूस, जि.सांगली डॉ. सदाशिव निवृत्ती जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
डॉ. पंतगराव कदम औद्योगिक वसाहत सहकारी
सोसायटी लि. पलूस, ता.पलूस, जि. सांगली श्री. महेंद्र विनायक इंगळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.६.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

**<u>विवेचन</u>**

मौजे पलूस, जि. सांगली येथील डॉ. पंतगराव कदम औद्योगिक वसाहतीतील भूखंडाचे करारनामे व संस्थेच्या मूळ नकाशाची प्रत ही माहिती आपल्याला मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. आकाराम मारूती शिसाळ यांनी केले.

श्री. शिसाळ यांनी मागितलेली काही माहिती १० वर्षापूर्वीची व काही इतर कार्यालयांशी संबंधित आहे. तसेच 'न्यायालयाच्या आदेशानुसार तयार केलेला नकाशा,' अशा स्वरुपाचे मूळातच न झालेल्या कागदपत्रांच्या प्रती देणे शक्य झाले नाही. शुल्क भरल्यानंतर त्यांना ऊर्वरित माहिती दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, डॉ. पंतगराव कदम औद्योगिक वसाहत सहकारी सोसायटी लि. पलूस, श्री. महेंद्र विनायक इंगळे यांनी सांगितले.

संस्थेकडील भूखंडाच्या मूळ नकाशाची प्रत व अन्य चार मुद्दयांबाबतची माहिती देण्याचा आदेश आपण दिला होता, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पलूस, ता.पलूस, जि.सांगली डॉ. सदाशिव निवृत्ती जाधव यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर संस्थेने शुल्क कळविले. तसेच श्री. शिसाळ यांनी सद्हेतूने माहिती मागितली नसून संस्थेची बदनामी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, असेही प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. इंगळे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, डॉ. पंतगराव कदम औद्योगिक वसाहत सहकारी सोसायटी लि., पलूस, यांनी संस्थेच्या भूखंडाबाबतच्या मूळ नकाशाची प्रत व संस्थेकडील माहिती एक आठवड्यात अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अंशत: मान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय विजय भिडे
१११११, उत्तर शिवाजीनगर, गणपती गॅस गोडाऊनजवळ, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर
महानगरपालिका, सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४२+३४३ / सांगली / |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय विजय भिडे
१११११, उत्तर शिवाजीनगर, गणपती गॅस गोडाऊनजवळ, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर
महानगरपालिका, सांगली, जि.सांगली श्री.वाय.बी.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरजश कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली श्री.शि.तु.रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.४.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

फायबर मुताऱ्यांच्या संदर्भातील प्रभाग क्र.३ बाबतची माहिती मिळाली. परंतु प्रभाग क्र.४ मधील माहिती २३ दिवस विलंबाने मिळाली. माहिती मिळण्यास विलंब झाल्यामुळे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.शि.तु.रसाळे यांना शास्ती करावी व आपल्याला नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी आपण केली होती, परंतु जन माहिती अधिकारी व माहिती देण्याची जबाबदारी असलेले संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी एकवेळ संधी देण्याची विनंती केल्यामुळे आपण ही मागणी मागे घेत आहोत, असे निवेदन अपीलकर्ता श्री.संजय विजय भिडे यांनी केले.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी व प्रभाग अधिकारी प्रभाग क्र.४ यांच्याकडून माहिती प्राप्त करून घ्यावयाची होती. श्री.भिडे यांचा अर्ज प्राप्त झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी या अधिकाऱ्यांकडून माहिती मागविली. परंतु वैद्यकीय आरोग्य अधिकारी (मिरज) यांच्याकडून माहिती मिळण्यास उशीर झाल्यामुळे श्री.भिडे यांना ती पुरविण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी श्री.शि.तु.रसाळे यांनी सांगितले.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी (मिरज) यांच्याकडून माहिती मिळण्यास विलंब झाल्याच्या निवेदनाला अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.वाय.बी.माळी यांनी दुजोरा दिला. प्रथम अपिलात आपण दिलेल्या निर्णयाप्रमाणे श्री.रसाळे यांनी पूर्ण माहिती घेऊन ती श्री.भिडे यांना दिली, तसेच मुताऱ्या

बसविलेल्या ठिकाणांची पाहणीही श्री.भिडे यांना करून दिली, असे प्रतिपादन विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.वाय.बी.माळी यांनी केले.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी (मिरज) डॉ.सुनील पांडुरंग अंबोळे यांच्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला असला, तरी त्यांना एकवेळ संधी देण्याची विनंती अपीलकर्त्यांनीच केली असल्यामुळे अशी संधी देण्यात येत आहे. डॉ.अंबोळे यांना याची लेखी जाणीव अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका यांनी द्यावी व त्याची प्रत आयोगाला सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका श्री.वाय.बी.माळी यांनी आयोगाला त्वरित सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रल्हाद मारुती भिलावे
४८, रघुनाथपुरा पेठ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार (शहर विकास विभाग),
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१ .८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रल्हाद मारुती भिलावे
४८, रघुनाथपुरा पेठ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा श्री.सतीश कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार (शहर विकास विभाग),
सातारा नगरपरिषद, सातारा श्री.प्रशांत राजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>'नगरपरिषद आपल्या दारी' या उपक्रमाद्वारे नगराध्यक्ष, मुख्याधिकारी व इतर कर्मचारी यांनी जागेवर जाऊन पहाणी करुन करंजे येथील सि.स.नं.९५ब येथील श्रीपतराव पाटील हायस्कूलच्या चारही बाजूंचे असलेले रस्ते आरक्षणमुक्त करण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी जागेचे नकाशे, प्रॉपर्टी कार्डचे उतारे नागरिकांनी सुपूर्त केले, त्यावर केलेली कार्यवाही. | |

## विवेचन

रस्ते आरक्षणमुक्त करण्यासंबंधात नगराध्यक्ष, मुख्याधिकारी व इतर अधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.प्रल्हाद मारुती भिलावे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

एका माजी नगराध्यक्षाच्या क्रीडांगणासाठी रस्ते कब्जेपट्टीने दिले गेले आहेत. त्यामुळे रस्ते अरुंद झाले आहेत व नागरिकांना हवा, प्रकाश आदी नैसर्गिक जीवनावश्यक सुविधा मिळू शकत नाही. या गैरप्रकाराची चौकशी होऊन संबंधित नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांना व अधिकाऱ्यांना शिक्षा व्हावी व रस्ते आरक्षणातून मुक्त करण्याच्या आश्वासनांची पूर्तता व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.भिलावे यांनी केली. आपल्याला घरासाठी परवानगी दिली असली तरी घराबाहेर पडण्यासाठी रस्ता नाही, अशी स्थिती असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कब्जेपट्टी सन १९८२ साली झालेली आहे. श्री.भिलावे यांनी विचारलेली माहिती देण्यात आलेली आहे. परंतु त्यांची मागणी आरक्षण वगळण्याची आहे. त्यासाठी त्यांनी नगरपालिकेकडे स्वतंत्र अर्ज करावा लागेल व ते त्यांना वेळोवेळी सपष्ट करण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.प्रशांत राजे यांनी सांगितले.

रस्त्यांवरील आरक्षण उठविण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र संबंधित जागेवर अतिक्रमण झाले आहे काय व ते झाले असल्यास नागरिकांच्या मागणीप्रमाणे कोणती कार्यवाही केली गेली, याची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) संबंधित जागेवर अतिक्रमण झाले आहे काय व ते झाले असल्यास नागरिकांच्या मागणीप्रमाणे कोणती कार्यवाही केली गेली, याची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याला देऊन आयोगाला दि.१०.१०.२००९ पर्यंत अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती अलका र. मराठे
गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत,
मिरज, जि. सांगली

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली
श्री. वाय. बी. माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री. एस.टी. रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परिसरासाठी पाण्याच्या निचऱ्याबाबतची व्यवस्था व त्यासंबंधीचे नियम, आदी माहिती अपूर्ण दिल्याच्या कारणावरुन अपीलकर्त्या श्रीमती अलका र. मराठे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्रीमती मराठे यांना उपलब्ध माहिती देण्यात आली. पाच वेगवेगळ्या विभागांकडून माहिती घेऊन संकलित करून पाठवावयाची होती, त्यामुळे विहित मुदतीपेक्षा सात दिवस विलंब झाला. मात्र प्रथम अपिलात अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे समक्ष जागेवर जाऊन श्रीमती मराठे यांची भेट घेऊन सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी आवश्यक ती कामे करुन घेतली आहेत, असे अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.१०.२००९

८. गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परीसरातील पथदिवे बसविणे व त्यांची देखभाल व दुरुस्ती करणेचे काम कोणाकडे असते, त्याच्या खर्चाची जबाबदारी कोणाची असते व त्या परीसरातील पथदिवे बसविणे व त्यांची देखभाल व दुरुस्ती करणेच्या खर्चासाठी गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहतीकडुन महानगर पालिका काही रक्कम वसुल करते का या बाबत तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी.

९. सन २०००-०१ते २००६-०७ या आर्थिक वर्षामध्ये बचत भवन इमारतीचा परीसर, गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परीसर, वटमूरे कॉर्नर परीसर, भोकरे कॉलनी परीसर, नियोजित सुंदर नगर परीसर या भागासाठी चे ड्रेनेज, रस्ते, पथदिवे या साठी बजेट मध्ये किती रुपये खर्चाची तरतुद केली होती व प्रत्यक्ष किती रक्कम खर्च झाली याची प्रत्येक वर्षाची आवकडेवारी मिळावी.

१०. सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या बजेट मध्ये बचत भवन इमारतीचा परीसर, गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परीसर, वटमूरे कॉर्नर परीसर, भोकरे कॉलनी परीसर, नियोजित सुंदर नगर परीसर या भागासाठी चे ड्रेनेज, रस्ते, पथदिवे या साठी बजेट मध्ये किती रुपये खर्चाची तरतुद केली आहे याची आवकडेवारी मिळावी.

(ऐक) माहितीचा विषय : वरील प्रमाणे
(दोन) माहितीशी संबंधीत कालावधी : वरील प्रमाणे
(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : वरील तपशिला प्रमाणे
(चार) माहिती टपालाने हवी किंवा कसे : होय
(पाच) टपाला बाबत (सर्वसाधारण नोंदणीकृत किंवा शिघ्र) : सर्वसाधारण नोंदणीकृत

४ अर्जदार दारीद्रेषेखालील आहे काय : नाही.
५ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये रुपये १०/= चे कोर्ट फी तिकीट लावले आहे
६ वरील माहिती बाबत कोणत्याही झेरॉक्सप्रतीची मागणी केलेली नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१.०१.२००७

अर्जदाराची सही

For [signature]

जोडपत्र-अ

<u>जोडपत्र-अ (पहा नियम ३) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये</u>

प्रती :
मा. उप आयुक्त,
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
मिरज ४१६ ४१६.

१ अर्जदाराचे पुर्ण नांव : श्रीमती अलका र. मराठे
२ पत्ता : गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत मिरज ४१६ ४१० (सांगली).
३ आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : सांगली मिरज कुपवाड शहर महानगर पालिकेतील गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परीसर बाबत खालील प्रमाणेची माहिती तपशिलवार लेखी स्वरुपात मिळावी.

1. गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परीसरात तेथील नागरीकांसाठी व उद्योगांसाठी सांड पाण्याच्या निचऱ्याची व पावसाचे पाणी वाहुन जाण्यात अडचण येऊ नये या बाबत कोणती व्यवस्था महानगर पालिकेने केली आहे या बाबत तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी.
2. पावसाचे पाण्याचा निचरा होणे किंवा ते नैसर्गिक नाल्यावाटे वाहुन जाण्यास अडकाठी होऊ नये या साठी महानगर पालिकेचे बांधकामाबाबत विशेष नियम आहेत का व ते कोणते आहेत या बाबत तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी.
3. अशा नियमांची अंमलबजावणी करणेचे काम महानगर पालिकेच्या कोणत्या पदाच्या अधिकाऱ्याकडे असते या बाबत तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी.
4. अशा नियमांचा भंग करुन झालेल्या बांधकामाबाबत महानगर पालिकेच्या वतीने कोणती कारवाई करण्यात येते या बाबत तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी
5. बचत भवन इमारतीचा परीसर, गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परीसर, वटम्हे कॉलनी परीसर, भोकरे कॉलनी परीसर, नियोजित सुंदर नगर परीसर येथे नसर्गिक नाले किती आहेत या बाबत तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी.
6. महानगर पालिकेकडील रेकॉर्ड नुसार सन १९९५-९६ साली वर उल्लेख केलेल्या परीसरातील नैसर्गिक नाल्याच्या रुंदी व खोली बाबतची आकडेवारी मिळावी.
7. गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत परीसरातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती करणेचे काम कोणाकडे असते, त्याच्या खर्चाची जबाबदारी कोणाची असते व त्या परीसरातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती खर्चासाठी करणे साठी गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहतीकडुन महानगर पालिका काही रक्कम वसुल करते का या बाबत तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १.

श्री.फरहाद शब्बीर आलासे
नंदीवेस, कोळी गल्ली, शास्त्री चौक,
मिरज, ता.मिरज, जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर पोलीस अधीक्षक,
सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरज
मिरज विभाग, मिरज,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५१/२००९/सांगली |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाचे पत्र क्र.अपील ३५१/सांगली , दि.४/७/२००९ रोजीच्या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या आयोगाच्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी , मिरज विभाग, मिरज, जिल्हा सांगली यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांना सक्त ताकिद दिलेली होती. ती रद्द करण्याची विनंती केली होती. सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा शहर पोलीस निरीक्षक, मिरज शहर यांनी विहीत मुदतीमध्ये जन माहिती

अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरज विभाग, मिरज यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी , मिरज विभाग, मिरज, जिल्हा सांगली यांनी दि. ११/७/२००९ रोजीच्या निवेदनात नमूद केले आहे. मात्र ही बाब जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरज श्री. दिपक देवराज यांनी आयोगाच्या निदर्शनास आणलेली नव्हती हे योग्य नाही. श्री. देवराज यांनी सादर केलेला खुलासा मान्य करुन आयोगाचे आदेशात पुढीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

## आदेश

सदर अपीलामध्ये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरज विभाग, मिरज यांच्या ऐवजी सहायक जन माहिती अधिकारी तथा शहर पोलीस निरीक्षक, मिरज श्री. बी.बी.रेड्डी यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांना सक्त ताकिद देण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६-१०-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

कु.नितीन रामचंद्र पाटील
ब्रम्हास्त्र बि.सिटी सर्व्हे नं.३९५, संभाजी पवार तालीमला लागून,
सांभारे गणपती रोड, गावभाग, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन, मॅनेजिंग कौन्सिल लठ्ठे एज्युकेशन सोसायटी,
राजनेमी कॅम्पस टिंबर ऐरिया, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय,
राजनेमी कॅम्पस टिंबर ऐरिया, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६२ / सांगली /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** कु.नितीन रामचंद्र पाटील
ब्रम्हास्त्र बि.सिटी सर्व्हे नं.३९५, संभाजी पवार तालीमला लागून,
सांभारे गणपती रोड, गावभाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन, मॅनेजिंग कौन्सिल, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी,
राजनेमी कॅम्पस, टिंबर एरिया, सांगली प्रतिनिधी डॉ.के.एस.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.५.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

ब्रेकेज ड्यूजच्या संदर्भातील १९ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.नितीन रामचंद्र पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, राजनेमी कॅम्पस, टिंबर एरिया, सांगली यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, मॅनेजिंग कौन्सिल, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, राजनेमी कॅम्पस, टिंबर एरिया, सांगली यांनी आपल्या अनुपस्थितीत निर्णय दिला. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीसाठी ५०००/- रुपये शुल्क कळविले. हा माहिती नाकारण्याचाच प्रकार होता. अपिलाच्या सुनावणीचे पत्र आपल्याला सुनावणीच्या दुसऱ्या दिवशी मिळाले. जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणतीही माहिती दिलेली नसतानाही माहिती देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, राजनेमी कॅम्पस, टिंबर एरिया, सांगली यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व महाविद्यालयातील याबाबतचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार उघडकीस येण्यासाठी संबंधित सर्व कागदपत्रे जप्त करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी श्री.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

ब्रेकेज ड्यूज या शुल्काद्वारे महाविद्यालयाकडे प्रतिवर्षी लाखाच्या घरात रक्कम जमा होते. मोडतोड होण्याचा संभव असणारी कोणतीही सामग्री विद्यार्थ्यांना वापरण्यास देण्यात येत नाही व ज्या विषयांना असे प्रयोग नसतात, त्या विषयांच्या विद्यार्थ्यांकडूनदेखील सरसकट हे शुल्क घेतले

जाते. शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पर्यंत त्याच्या पावत्या महाविद्यालयाकडून दिल्या जात नव्हत्या. या विषयावर कुलगुरु, राज्यपाल आदी विविध पातळ्यांवर विद्यार्थ्यांनी संघटीतपणे केलेल्या प्रयत्नानंतर शैक्षणिक वर्ष २००६-२००७ मध्ये पावत्या दिल्या गेल्या, असेही श्री.पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.पाटील यांनी मागितलेली माहिती वीस वर्षांच्या कालावधीतील असल्यामुळे रुपये ५००० अनामत रक्कम जमा करण्यास कळविले होते. माहिती पूर्ण झाल्यावर अनामत रकमेचा खर्च वजा जाता रक्कम परत केली जाईल व जास्त खर्च झाला असल्यास ती आपल्याला भरावी लागेल, असे एका आठवड्याच्या आत श्री.पाटील यांना कळविले होते. त्यांनी असे शुल्क भरले नाही. त्यांनी माहिती मागितली तो कालावधी प्रवेश देणे आदी कामाचा होता. ब्रेकेज ड्यूजबाबतची सन २००४ ते २००७ या काळातील २२२ पानांची माहिती तयार ठेवली होती व ऊर्वरित १७ वर्षांमधील माहितीचे अवलोकन करु दिले जाणार होते. तसे पत्र त्यांना देण्यात आले. त्यांनी कागदपत्रांची पाहणीही केली. महाविद्यालयाच्या सर्व विभागांच्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी मागितल्या आहेत. काही माहिती देण्यात आली, परंतु शुल्क भरल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर अन्य प्रती देणे शक्य नाही, याचीही कल्पना त्यांना दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, राजनेमी कॅम्पस, टिंबर एरिया, सांगली डॉ.के.एस.पाटील यांनी केले.

ब्रेकेज ड्यूजच्या कागदोपत्री नोंदी उपलब्ध आहेत. अपीलकर्त्याने विस्तृत माहितीची मागणी केली आहे. मात्र 'शाखेच्या विषयानुसार वर्गवारी करुन तक्ता स्वरुपात माहिती द्यावी,' अशा स्वरुपाची अथवा खुलासा, अन्वयार्थ, अभिप्राय यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही. तसेच माहितीसाठी कळविलेले शुल्क भरणे आवश्यक आहे. ते भरावे व न मिळालेल्या माहितीची नेमकी यादी जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांना श्री.पाटील यांनी द्यावी व त्यानुसार जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी सात दिवसांत त्याचे उत्तर द्यावे, उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करता,

शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

श्री.पाटील यांचा माहितीबाबतची यादी कळविणारा कोणत्याही प्रकारचा अर्ज आला नसल्याचे जन माहिती अधिकारी प्राचार्य डॉ.के.एस.पाटील यांनी दि.१८.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर केशव दखनकर
प्राध्यापक, न्यायवैद्यक शास्त्रभारती विद्यापीठ व हॉस्पिटल,
कामलसवाडी, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
सीपीआर रुग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
सीपीआर रुग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७२ / सांगली /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर केशव दखनकर
प्राध्यापक, न्यायवैद्यक शास्त्रभारती विद्यापीठ व हॉस्पिटल,
कामलसवाडी, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
सीपीआर रुग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.अ.आ.कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. — |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वेतन थकबाकी दि.३०.१.२००२ ते दि.१.१२.२००५ |

## विवेचन

आपला परिविक्षाधीन कालावधी दि.३०.१.२००२ रोजी पूर्ण होऊनही वेतन थकबाकी मिळालेली नाही, म्हणून अपीलकर्ता डॉ.शंकर केशव दखनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.३०.१.२००२ ते १.१२.२००८ या कालावधीतील वेतन थकबाकी देय आहे, असे डॉ.दखनकर यांनी नमूद केले. डॉ.दखनकर हे जिल्हा परिषद, चंद्रपूर येथे कार्यरत असतानाचे ना-देय प्रमाणपत्र सादर न झाल्यामुळे वेतन थकबाकी काढता आलेली नाही, असे ते सीपीआर रुग्णालय, कोल्हापूर येथे कार्यरत असताना वेळोवेळी त्यांना कळविण्यात आले आहे व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्याशीही त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.अ.आ.कांबळे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. तसेच आता थकबाकीचे बिल तयार करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. वेतनातील थकबाकी मिळणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. तथापि त्याबाबतच्या अद्ययावत माहितीच्या दृष्टीने थकबाकीच्या बिलाची प्रत व पूर्तता झाल्यानंतर अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

डॉ.राजाराम भागवतराव पवार
किल्ला भाग, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रभारी कुलसचिव,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जनसंपर्क अधिकारी
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००८ (वि.अ.नि.का) |
| ३ | **उपस्थिती :-**<br><br>**अपीलकर्ता :-** डॉ. राजाराम भागवतराव पवार<br>किल्ला भाग, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा:-** प्रभारी कुलसचिव,<br>सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. पी.बी. भिंगारे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** जनसंपर्क अधिकारी , सोलापूर विद्यापीठ, सोलापूर<br>श्री. पी. डी. माळी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. आदेश नाही. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी डॉ. एस. डी. कदम यांना कारणे दाखवा नोटीस क्र. ॲफी/ टी.एस/ एसयुके/ १६२२ दि. १६.१०.२००० आणि इतर पत्राच्या प्रती, दलित मित्र कदम गुरूजी महाविद्यालय, मंगळवेढा येथे प्रशासकाची नियुक्ती करणेबाबतचे पत्र, दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय, मंगळवेढामधील प्राध्यापक निवडीबाबतची माहिती, कदम गुरूजी महाविद्यालयामधील प्राचार्य निवडीबाबतची कागदपत्रे व इतर एकूण ८ मुद्दे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याचदिवशी सुनावणी घेण्यात आली.

अर्ज करून दोन वर्षे होऊनही मागणीप्रमाणे प्रमाणित नकला पूर्णतः दिल्या नसल्याचे व दिलेल्या नकला विलंबाने दिल्याचे अपीलकर्ता डॉ. राजाराम भागवतराव पवार यांनी लेखी नमूद केले.

पूर्वी शिवाजी विद्यापीठ होते. नवीन सोलापूर विद्यापीठ स्थापन झाल्यावर संचिका प्राप्त करून घेऊन माहिती तयार केलेली आहे. 'सर्व कागदपत्रे ' असा शब्द असल्याने संचिका पाहण्यासाठी अपीलकर्त्यास दि. ६.१२.२००७ ला पत्र पाठविले. परंतु त्यांनी संपर्क साधला नाही. दि. १९.६.२००८ रोजीच्या ' विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त समक्ष माहिती घेण्यास अपीलकर्त्याने नकार दिला, असे जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी डॉ. पी. डी. माळी यांनी नमूद केले.

डॉ. राजाराम पवार यांचा मूळ अर्ज दि. २४.४.२००६ चा असून शिवाजी विद्यापीठाकडून काही कागदपत्रे दि. ७.३.२००७ रोजी मिळाली. डॉ. पवार यांच्या मागणीतील मुख्य मुद्दा असलेल्या दलित मित्र कदम गुरूजी महाविद्यालय, मंगळवेढा बाबतची मूळ कागदपत्रे दि. ७.०३.२००७. व दि. १७.०३.२००८ रोजी मिळाली, असे डॉ. माळी यांनी दि. १८.०६.२००८ च्या पत्राने पूरक कागदपत्रांसह आयोगास कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेले कागदपत्रे लक्षात घेता पुढील बाबी स्पष्ट होतातः

१) सोलापूर विद्यापीठ नव्याने स्थापन झाल्याने विद्यापीठाशी सबंधित माहिती अपीलकर्त्यास देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केला आहे.

२) मागितलेल्या माहितीबाबत संचिका पाहण्यास न जाणे व माहिती नाकारणे ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

शिवाजी विद्यापीठाशी सबंधित कागदपत्रांचे हस्तांतरण चालू असल्याने माहिती देण्यास विलंब झाल्याचा जन माहिती अधिकारी यांचा खुलासा ग्राहय धरण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.१०.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेंद्र आदाप्पा धुळासावंत
रा. नांदणी, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.,
उपविभाग शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.,
उपविभाग शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.,
उपविभाग शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री. माणिकचंद्र आण्णा लवटे

**माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.,
उपविभाग शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी
श्री. रावसाहेब नामदेव चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे नांदणी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील किती शेतकऱ्यांनी वीज बिल भरलेली नाहीत व किती शेतकऱ्यांकडून रक्कम येणेबाकी आहे. तसेच सन २००४ पासून मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे घोषणेप्रमाणे सर्व शेतकऱ्यांना मोफत विज दिली जाते. किती शेतकऱ्यांचे विज कनेक्शन वीज न भरल्यामुळे बंद केली याबाबत व इतन अनुषंगिक माहिती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी सदर कार्यक्रमास अपीलकर्ता उपस्थित नव्हते, त्यामुळे दि.७.१.२००९ रोजी कोल्हापूर येथे सुनावणी घेण्यात आली. त्यावेळीही अपीलकर्ता गैरहजर होते. मात्र त्यांना रजिस्टर टपालाने विहित मुदतीत माहिती देण्यात आली असल्याचे, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी श्री. रावसाहेब नामदेव चव्हाण यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. जन माहिती अधिकारी यांनी अर्ज स्वीकारला नाही, त्यामुळे टपाल परत आले, अशी तक्रार श्री. धुळासावंत यांनी प्रथम अपिला प्रमाणेच राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे. मात्र संबंधित टपाल स्वीकारल्याचे तसेच प्रथम अपील न करता सुमारे एक वर्षानंतर आयोगाकडे अपील केले असल्याचे पूरक कागदपत्रांसह श्री. चव्हाण यांनी निदर्शनास आणले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ०८ .१०.२००९**